सकाळ

सकाळ TODAY

सोमवार, २२ एप्रिल २०२४ | सिंधुदुर्ग | SakalNews | SakalMediaNews | www.esakal.com

आपल्या प्रतिक्रिया व अंक घरपोच मिळवण्यासाठी नोंदणी करा
भेट द्या : www.sakalactive.com किंवा डाऊन करा
संपर्क : 98815 98815
सकाळ | सकाळ | साप्ताहिक | MONEY

पश्चिम घाटाचा सिंधुदुर्गातील 'कोअर एरिया' म्हणता येईल, अशा सह्याद्रीच्या रांगांमधील २५ गावे 'इको-सेन्सिटिव्ह एरिया' म्हणून घोषित करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. हा निर्णय वाघ व अन्य वन्यप्राण्यांना डोळ्यासमोर ठेवून घेतला असला, तरी त्याचा प्रभाव निसर्गाशी एकरूप होऊन जीवनशैली विकसित केलेल्या या देखण्या, सुंदर २५ गावांशी जोडलेला आहे. 'वनशक्ती' ही पर्यावरणवादी संस्था आणि या संस्थेचे स्टॅलिन दयानंद यांनी तब्बल १४ वर्षांचा वनवास झेलून हा विजय मिळविला. तोही पर्यावरणाचे संवर्धन या एकमेव कारणासाठी. हा लढा ग्लोबल वॉर्मिंगच्या चटक्यांनी भाजत असलेल्या कोकणसह पूर्ण पश्चिम घाटासाठी दिशादर्शक ठरणारा आहे. हा लढा आणि त्याचे फलित समजून घेण्याचा हा प्रयत्न...

■ - शिवप्रसाद देसाई

वाघाने वाचविली २५ गावे

पर्यावरणाचा नवा पॅटर्न

'वनशक्ती'च्या लढ्यामुळे इको-सेन्सिटिव्हचे कवच

द बिग स्टोरी..

लढ्याची सुरुवात

मुंबई उच्च न्यायालयाने सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यांतील २५ गावांमध्ये इको-सेन्सिटीव्ह एरिया करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी मुदतही ठरवून दिली आहे. या निर्णयापर्यंत पोहोचण्याचा प्रवास मात्र इतका सोपा नव्हता. याची सुरुवात २००९ मध्ये स्टॅलिन दयानंद यांच्यापासून झाली. खरं तर त्यावेळी खनिज प्रकल्पाला विरोध आणि पर्यायाने पर्यावरण संवर्धनासाठी दोडामार्ग तालुका ढवळून निघाला होता. कळणेमध्ये येऊ घातलेल्या खनिज प्रकल्पाला स्थानिकांचा प्रचंड विरोध होता; मात्र प्रशासनाच्या साथीने खनिज लॉबी सगळी ताकद लावत लोकांचा हा विरोध चिरडत होती. यामुळे सह्याद्रीच्या या भागात प्रचंड अस्वस्थता होती. याच लढ्यातील एक पर्यावरणवादी संदीप सावंत यांनी मुंबईतील 'वनशक्ती' संस्थेचे स्टॅलिन दयानंद यांना कळणेसह या भागात आणले. येथील पर्यावरण, लोकांची निसर्गाशी एकरूप झालेली जीवनशैली आणि पर्यावरणावर नांगर फिरवण्यासाठी बापरले जात असलेले पाशवी बळ पाहून दयानंद हेही आश्चर्यचकित झाले. हा लढा न्यायालयाच्या पाठीवार लढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. येथूनच संघर्ष सुरू झाला.

देशस्तरावर दखल; पण...

स्टॅलिन यांनी सुरुवातीला प्रसार माध्यमांपर्यंत हा विषय मांडायचे ठरवले. त्याचकाळात जागतिक स्तरावर पश्चिम घाट, त्याची समृद्धी आणि संवर्धन याला असलेले महत्त्व चर्चेत होते. अशा भागात मायनिंगसारखे प्रकल्प आणण्यासाठी लोकांचा विरोध चिरडला जात आहे, ही गोष्ट मोठी होती. त्याची राष्ट्रीय स्तरावरील प्रसार माध्यमांनी दखल घेतली. हा विषय केंद्र सरकारच्या निदर्शनास आला. त्यांनी राज्य सरकारला यात लक्ष घालण्यास सांगितले; मात्र राज्य सरकारघील काही अदृश्य हात खनिज प्रकल्पांच्या समर्थनासाठी असल्याने त्याची फारशी दखल घेतली गेली नाही.

न्यायालयीन लढ्याचा पर्याय

स्टॅलिन यांनी न्यायालयीन लढ्याचा निर्णय घेतला. वनशक्ती ही संस्था त्या काळात लहान होती. त्यांनी यासाठी 'आवाज फाउंडेशन' या संस्थेची मदत घेतली. उपलब्ध माहितीच्या आधारे आवाज फाउंडेशनतर्फे याचिका दाखल करण्यात आली. ही याचिका प्रामुख्याने येथील वनसंवर्धन, खनिज प्रकल्पांसारख्या पर्यावरणाला घातक गोष्टींना विरोध यासाठी होती. इको-सेन्सिटिव्ह एरिया जाहीर करण्यासाठी सुमारे १३ निकष ठरलेले असतात. यातील काही निकष जरी लागू झाले, तरी तो भाग संरक्षित केला जातो. आवाज आणि वनशक्ती या दोन्ही संस्थांनी याची पडताळणी केली असता जवळपास तेराही निकष दोडामार्ग, सावंतवाडीतील हा भाग पूर्ण करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्याच आधारे न्यायालयाकडे याचिका दाखल झाली होती. उच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचुड यांनी २०१३ मध्ये या याचिकेवर एक आदेश काढला. यात त्यांनी हा भाग इकोसेन्सिटीव्ह होण्याबाबत शंका नसल्याचे म्हणत आवश्यक प्रक्रिया करण्याबाबतच्या सूचना सरकारला केल्या. न्यायालयाकडून दोडामार्गात वृक्षतोडबंदीचेही आदेश देण्यात आले.

संघर्ष जीवघेण्या वळणावर

इथपर्यंतच्या न्यायालयीन लढाईची खनिज प्रकल्प समर्थकांनी फारशी दखल घेतली नव्हती; मात्र न्यायालयाने इको-सेन्सिटीव्हबाबत आदेश काढत राज्याला सूचना केल्यानंतर वातावरण बदलले. स्टॅलिन आणि त्यांच्या याचिकेबाबत अपप्रचार सुरू झाला. इको-सेन्सिटिव्ह झाल्यास घराची दुरुस्तीही करता येणार नाही, जगणे कठीण होईल, अशा कितीतरी अफवांचा प्रसार झाला. यात काही अधिकारी, मायनिंग समर्थक लॉबी, काही राजकारणी यांचा थेट सहभाग होता. यातून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला गेला. स्टॅलिन यांना मारण्याच्या धमक्या आल्या. ते सावंतवाडी, दोडामार्ग दौऱ्यावर आले असता मारण्याचा कट आखल्याचा आरोपही स्टॅलिन यांनी केला. सिंधुदुर्गात एक गुंठाही जमीन नसलेल्या आणि स्थानिकांची समृद्ध जीवनशैली व पर्यावरण याच्यासाठी पदरमोड करून संघर्ष करणाऱ्या स्टॅलिन यांच्यासाठी हा क्षण नाउमेद करणारा होता. न्यायालयाच्या आदेशावरही राज्य सरकारने कोणतेच पाऊल उचलले नव्हते.

लढ्याचा दुसरा टप्पा

याचदरम्यान पश्चिम घाट अभ्यासासाठी नेमलेल्या माधव गाडगीळ अभ्यास समितीचा अहवाल आला. यात स्टॅलिन यांच्या संघर्षातील २५ पैकी बऱ्याच गावांचा इको-सेन्सिटिव्ह म्हणून विचार व्हावा, यासाठीचा उल्लेख होता. यावर नेमलेल्या कस्तुरीरंगन उच्चस्तरीय समितीने आपला नवा अहवाल दिला. यात सर्वाधिक पर्यावरण समृद्धी असलेल्या अख्या दोडामार्ग तालुक्याला वगळले होते. खरंतर हा धक्कादायक प्रकार होता. स्टॅलिन आणि त्यांच्या वनशक्ती संस्थेने याबाबत माहिती मिळवली. यात समजले की, प्रशासनानेच जाणूनबूजून या समितीला अभ्यासासाठी सिंधुदुर्गाचा दोडामार्ग तालुका निर्मिती आधीचा जुना नकाशा दिला होता. यामुळे अहवालात दोडामार्ग तालुका हा सावंतवाडीचाच भाग दिसत होता. यामुळे दोडामार्गचा उल्लेख आला नाही. त्याचा वेगळा अर्थ लावत दोडामार्ग वगळल्याची पळवाट काढण्यात आली. त्यामुळे हा संघर्ष पर्यावरणासह खूप मोठ्या लॉबीशी असल्याचे स्टॅलिन यांच्या लक्षात आले. या लॉबीला वनाचे ज्यांनी संवर्धन करायला हवे, अशा प्रशासनाचीच साथ असल्याचेही पुढे आले. त्यामुळे लढ्याचा पुढचा टप्पा अधिक अभ्यास करून लढण्याचे त्यांनी ठरविले.

लढाईचा निर्णायक टप्पा

या सगळ्या संघर्षात स्वतः स्टॅलिन यांच्यासह संदीप सावंत, डॉ. जयेंद्र परुळेकर व इतरांनी माहितीच्या अधिकारात हजारो कागदपत्रे मिळविली. त्याचा अभ्यास केला. यावेळी वाघांच्या संवर्धनासाठी कॉरिडॉर समृद्ध राखण्यासंदर्भातील एक अहवाल त्यांच्या हाती लागला. तो लालफितीत गुंडाळून ठेवला होता. त्याचाच आधार घेत मागेली ते आंबोली हा वाघाचा कॉरिडॉर संरक्षित करा, अशी याचिका 'वनशक्ती'मार्फत उच्च न्यायालयात दाखल करण्यात आली. यानंतर गिरीश पंजाबी यांच्यासह अनेक पर्यावरण अभ्यासकांचे अहवाल वन विभागाने दुर्लक्षित ठेवल्याचे पुढे आले. याचिकेतील हा नवा टप्पा अधिक अभ्यासपूर्ण होता. न्यायालयात दीर्घकाळ याची सुनावणी झाली. असे कित्येक दिवस गेले की, ज्यावेळी फक्त तारीख मिळत होती आणि स्टॅलिन दिवस दिवस न्यायालयात बसून असायचे. त्यांना या प्रवासात चांगले आणि वाईट असे दोन्ही प्रकारचे अधिकारी, लोक भेटले. न्यायालयाने सरकारला या संदर्भात अंमलबजावणी करण्यास सांगितले; मात्र राज्य सरकारने पुन्हा याबाबत अभ्यास करावा लागेल, असे उत्तर दिले. यासाठी एका संस्थेची नियुक्ती करण्यात आली. त्या संस्थेने अभ्यास करून या भागात वाघ असल्याबाबत सकारात्मक अहवाल दिला. तोही बासनात गुंडाळून सरकारने फारसे काही केले नाही.

अखेर न्याय मिळाला

अखेर गेल्या आठवड्यात उच्च न्यायालयाने या संदर्भात निर्णय दिला. न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती एम. एम. साठे यांच्या खंडपीठाने संबंधित २५ गावे इको-सेन्सिटिव्ह एरिया म्हणून घोषित करणे आवश्यक असल्याने राज्याने तसा प्रस्ताव केंद्राला सादर करावा. पुढच्या चार महिन्यांत या आदेशाची अंमलबजावणी करावी, असे आदेश दिले. यामुळे ठरलेल्या मुदतीत राज्याला पावले उचलणे भाग पडणार आहे. इको-सेन्सिटिव्ह एरिया घोषित करण्याचा उल्लेखही या आदेशात आहे. यामुळे पुन्हा पळवाट काढण्याची फारशी संधी राहिलेली नाही.

२५ गावांतील जैवसंपन्नता

- कर्नाटक, गोवा आणि सिंधुदुर्ग असा वाघाचा कॉरिडॉर असलेल्या भागात ही २५ गावे येतात. भारतीय वन्यजीव संस्थान (डब्ल्यू. आय.आय.) संस्थेच्या सर्वेक्षणात या कॉरिडॉरमध्ये तब्बल ५० पट्टेरी वाघांचे वास्तव्य आढळले होते.
- अस्वल, हत्ती अशा अप्रसाखळीतील वरच्या स्तरातील प्राण्यांचे भ्रमण.
- तिलारीसह परिसरात अतिशय दुर्मिळ 'स्लेंडर लोरीस' अर्थात वनमानवाचा आढळ.
- बॉम्बे बुश फ्रॉग, मलबार ग्लायडिंग फ्रॉगसह विविध प्रकारच्या बेडकांचे वास्तव्य.
- उडणारा सोनसर्प, हम्प नोज पीट वायपर, किंग कोब्रा यांच्यासह विविध सापांचा अधिवास
- मलाबार ट्रॉगॉन, मलाबार बार्बेट, सुतार पक्षी, महाधनेश आदी दुर्मिळ होत जाणाऱ्या पक्षांचे वास्तव्य
- ब्लॅक पँथर, जंगली कुत्रे, शेकरू आदींचे दर्शन
- वनौषधी, प्राचीन वृक्ष, देवराया यांचा समृद्ध ठेवा.

काय होणार फायदे?

- २५ गावांत प्रस्तावित ३२ खनिज प्रकल्प थांबणार
- भविष्यात प्रदूषणकारी प्रकल्पांना पायबंद
- जैवविविधता जागतिक नकाशावर झळकण्याची संधी
- पर्यावरणपूरक उद्योगांना संजीवनी
- निसर्ग पर्यटन, कृषी पर्यटनाला चालना
- झाडे, जंगले वाचल्याने जलस्रोतांना बळकटी
- पारंपरिक नारळ, सुपारी पिकाला पोषक वातावरण
- भविष्यात ग्लोबल वॉर्मिंगची गंभीर स्थिती लक्षात घेता इको-टुरिझममधून या गावांना श्रीमंत होण्याची संधी.

इको सेन्सिटिव्ह होणारी गावे

- दोडामार्ग तालुका - भेकुर्ली, कुंभवडे, खडपडे, तळकट, झोळंबे, कोलझर, शिरवल, कुंब्रल, घारपी, फुकेरी, पणतुर्ली, उगाडे
- सावंतवाडी तालुका - केसरी, फणसवडे, उडेली, दाभील, नेवली, सरमळे, ओटवणे, असनिये, पडवे माजगाव, तांबोळी, डेगवे, कोनशी, भालावल.

अवमान याचिकेची तयारी

■ हा न्यायालयीन लढा सुरू असताना उच्च न्यायालयाने दोडामार्ग तालुक्यात वृक्षतोड बंदीचा आदेश दिला; मात्र हा आदेश धाब्यावर बसवत शेकडो हेक्टर क्षेत्रात वृक्षतोड झाली. काही ठिकाणी तर वन अधिकाऱ्यांनी अधिकृत परवाने दिले. याबाबत तत्कालीन जिल्हाधिकारी, वन विभाग यांचे वारंवार लक्ष वेधूनही त्यांनी दखल घेतली नाही. यामुळे तत्कालीन जिल्हाधिकारी व वन यंत्रणेविरोधात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे स्टॅलिन यांनी सांगितले.

कशी होणार अंमलबजावणी?

- संबंधित २५ गावांमध्ये इको-सेन्सिटिव्ह एरिया करण्याबाबतचा प्रस्ताव राज्याने केंद्राला पाठवायचा आहे.
- हा प्रस्ताव आल्यानंतर केंद्राने अधिसूचना जारी करायची आहे.
- ही सगळी प्रक्रिया पुढच्या साधारण चार महिन्यांत पूर्ण करायची आहे.
- यानंतर सर्व २५ गावांचा स्वतंत्र मास्टरप्लान बनणार आहे. यात नेमक्या कोणत्या गोष्टी घ्यायच्या, कशाला सवलत द्यायची, याचा अंतर्भाव असेल.
- मास्टरप्लान बनविण्यासाठीच्या समितीला स्थानिकांचा अभिप्राय घेणे अनिवार्य आहे. स्थानिक लोकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होणार नाही, याची यात दक्षता घेणे अपेक्षित आहे.
- याचिकाकर्त्यांनी वाघाच्या किंवा निसर्गाच्या संवर्धनासाठी ती दाखल केली असली, तरी येथील पर्यावरण समृद्ध जीवनशैली अबाधित राखणे, हा याचा मूळ उद्देश होता. कारण केवळ वाघांसाठी हा लढा असता, तर कदाचित अभयारण्याची मागणी करण्याचा पर्याय त्यांच्यासमोर होता. तसे झाले असते, तर स्थानिकांचे स्थलांतर करावे लागले असते. शिवाय इको-सेन्सिटिव्ह झोन मागण्याचा पर्यायही त्यांनी स्वीकारला नाही. झोन झाला असता तरी अधिक कडक निकष लागू झाले असते. आता या भागात इको-सेन्सिटिव्ह एरिया जाहीर करण्याचे आदेश निघाले आहेत. तो योग्यरित्या राबवल्यास पर्यावरण, निसर्ग आणि येथील भूमिपुत्र हे हातात हात घालून समृद्ध जीवन जगणार आहेत. मायनिंग व अन्य प्रकल्पांची टांगती तलवार कायमची दूर होणार आहे.

काय आहेत नवी आव्हाने?

- खनिज लॉबी थंडावली असली तरी दिल्ली लॉबी सक्रिय झाली आहे. शेजारी गोव्यात मोपा येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ झाल्यापासून या २५ पैकी बहुसंख्य गावांत जमीन खरेदीसाठी एजंट सक्रिय झाले आहेत. आमिषे दाखवत जमिनी घेऊन डोंगर, जंगल या ठिकाणी वृक्षतोड करत निवासी जागा (एन्ए प्लॉट) तयार केल्या जात आहेत. सासोली हे याचे उदाहरण म्हणता येईल. असेच सुरू राहिल्यास येथील जैवसंपदा नष्ट होण्यावरोबरच भूमिपुत्रही येथून हळूहळू हद्दपार होणार आहे.
- काजू लागवडीसाठी डोंगरावर बेसुमार वृक्षतोड केली जात आहे. तेथे संकरित काजू रोपांची लागवड होत आहे. एकाच प्रकारची झाडे (मोनो कल्चर) लावल्याने पर्यावरणीय विविधता नष्ट होऊन निसर्गचक्र विस्कटण्याची भीती आहे.
- डोंगर रांगामध्ये जेसीबी, बुलडोझर अशा अजस्र यंत्रांचा वापर करत जमिनीची नैसर्गिक रचना बिघडवली जात आहे. यामुळे डोंगर खचण्यासारखे प्रकार वाढले आहेत.
- बेकायदा वृक्षतोड आणि जंगली झाडांच्या पूर्वलागवडीचे काहीच धोरण नसल्याने जैवसंपदा टिकविणे आव्हान असणार आहे.

या लढ्यासाठी काढलेली १४ वर्षे वनवासासारखीच होती. हल्ल्याचे कट, हल्ल्याचे प्रयत्न, मानसिक त्रास, तासन् तास कोर्टात बसून राहण्यापासून खूप मोठी होत्या; पण शेवटी आमच्या बाजूने, पर्यावरणाच्या बाजूने झालेला निकाल समाधान देऊन गेला. या प्रवासात चांगले अधिकारी भेटले, तसे वाईटही आडवे आले. कोकणात जशी निसर्गाने समृद्धी दिली, तसे येथील लोकही जागृत आहेत. आम्हाला पर्यावरणाच्या बाजूने लढून जिंकताही येते, याचे उदाहरण 'सेट' करण्यात यश आले. यातून पर्यटन, निसर्गरूप उद्योग या मागनि समृद्धी येईल, याची खात्री आहे.

- स्टॅलिन दयानंद, याचिकाकर्ते, वनशक्ती संस्था

आम्ही ही लढाई सुरू केली, तेव्हा मायनिंग लॉबीची दहशत, दबाव होता. आता परिस्थिती बदलली आहे. हा सगळा लढा केवळ अभ्यास आणि कागदपत्रांच्या आधारे जिंकता आला. हा केवळ पाया तयार झाला आहे. अजूनही दोन्ही तालुक्यांतील जैवसंपन्न बरीच गावे इको-सेन्सिटिव्ह होणे गरजेचे आहे. सगळीच लढाई लढणे आमच्या ताकतीच्या बाहेर आहे. उर्वरित गावे संरक्षित होण्यासाठी या भागातील अभ्यासू तरुणांनी पुढे यायला हवे. यासाठी आवश्यक पाठबळ देणारच आहोत. कोकणचा खऱ्या अर्थाने कॅलिफोर्निया करायचा आहे. यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. तरुणांनी आता शाश्वत विकासासाठीही पुढे यायला हवे. आपला विकासाचा मार्ग पर्यावरण, निसर्ग याच्या वाटेवरून जातो. ही वाट त्यांनी समजून घ्यायला हवी. खनिजासारख्या घातक प्रकल्पांविरोधात सजग राहायला हवे.

- संदीप सावंत, ग्रामस्थ तथा पर्यावरण अभ्यासक, असनिये.

कळणेत खनिज विरोधी खूप मोठा संघर्ष झाला; पण न्यायालयीन मार्ग अवलंबला गेला नाही. हा खरे तर 'पेपर वर्क'चा विजय आहे. माहितीचा अधिकार वापरून शेकडो कागदपत्रे गोळा करून, त्यांना योग्य दिशेने मांडून, संयम पाळत केलेल्या प्रयत्नांचा विजय आहे. यात स्टॅलिन हे 'कृष्ण' किंवा 'कृष्णनीतिज्ञ' मानले, तर प्रत्यक्ष कागदपत्र गोळा करण्यात सिंहाचा वाटा असलेले संदीप सावंत यांना 'अर्जुन' म्हणावे लागेल. हे पहिले यश आहे. अजून खूप मोठा टप्पा पार करायचा आहे. इको-सेन्सिटिव्हबाबत बरेच गैरसमज पसरवले गेले; मात्र याचमुळे विकास कसा होतो, याचे मंडित माधेशरन आणि महाबळेश्वरला पाहायला मिळते. भविष्यात ही गावे निसर्ग पर्यटनातून श्रीमंत होणार आहेत.

- डॉ. जयेंद्र परुळेकर, पर्यावरण अभ्यासक

सह्याद्रीमधील काही गावांसाठी हा निकाल खरंच सुखकारक आहे. या भागात समृद्ध जैवविविधता आहे. दोडामार्ग तालुक्याला यातून काही प्रमाणात न्याय मिळाला आहे. येथील जैवविविधता टिकविण्यासाठी याचा फायदा होईल.

- डॉ. गणेश मर्गज, पर्यावरण अभ्यासक